ISSN: 2393-8900 IMPACT FACTOR : 2.7825(UIF) VOLUME - 5 | ISSUE - 5 | JANUARY - 2019

HISTORICITY RESEARCH JOURNAL

# संत तुकारामांच्या समाजप्रबोधन कार्याचे समकालीन महत्त्व



प्रा.डॉ.संजय पांडुरंग चौधरी
प्रमुख, मराठी विभाग ,
भारत महाविद्यालय,जेऊर.

## प्रस्तावना :

२१ वे शतक हे विज्ञानाच्या अमर्याद आविष्काराचे शतक आहे. मानवी बुद्धीला आव्हान देणाऱ्या या शतकातील नवनवीन आव्हाने पेलताना होणारी दमछाक अटळ आहे. एका बाजूला पराकोटीचा मूलतत्त्ववाद आणि दुसऱ्या बाजूला तंत्रज्ञानाची झेप या संघर्षात सामान्य माणसाला "रात्रंदिन आम्हा युध्दाचा प्रसंग | अंतःर्बाहय जग आणि मन ||" या संत तुकारामांच्या वचनांची घडोघडी आठवण येते म्हणूनच गेल्या साठ वर्षात संत तुकारामांच्या जीवन कार्याचा पुनर्विचार करणारे अनेक ग्रंथ मराठी भाषेत निर्माण झाले. यामध्ये वि.भ.कोलते, गं.भा.सरदार,भालचंद्र नेमाडे, आ.ह. साळुंखे, सुदाम सावरकर, दिलीप चित्रे, सदानंद मोरे, किशोर सानप या सारख्या परिवर्तनवादी विचारवंतांनी तुकारामांच्या जीवन कार्यावर आपापल्या परीने प्रकाश टाकला आहे.

महाराष्ट्राच्या सामाजिक, सांस्कृतिक, आध्यात्मिक आणि राजकीय घडामोडीमध्ये आपल्या स्वसामर्थ्याने आपली नाममुद्रा उमटविणाऱ्या युगपुरुषांमध्ये संत तुकारामांचे नाव प्राधान्याने घ्यावे लागते. इ.स.१६०८ ते इ.स. १६५० या अवघ्या बेचाळीस वर्षाच्या कालखंडात तुकारामांनी संत, कवी, प्रबोधनकार, तत्वज्ञ, समाजसुधारक आणि धर्मसुधारक म्हणून ऐतिहासिक कार्य केले. तुकारामांच्या या ऐतिहासिक जीवनकार्याचे समकालिन महत्त्व विचारात घेऊन प्रस्तुत शोधनिबंधाची मांडणी केलेली आहे.

कालानुसार राजकीय, सामाजिक, सांस्कृतिक व धार्मीक संदर्भ बदलत असतात त्याचप्रमाणे जीवन विषयक दृष्टीकोनातही बदल होत असतात. असे असले तरी मानवी जीवनाचा मूलगामी तत्त्वशोध घेणाऱ्या समाजचिंतकाला काही कालातीत स्वरुपाचे सत्त्वशोध लागत असतात आणि ते समाजहितासाठी महत्त्वपूर्णही असतात. त्याचप्रमाणे संत तुकारामांनी केलेले जीवीत कार्य हे वर्तमानकालातही अत्यंत महत्त्वपूर्ण आहे.

संत तुकाराम हे एक अत्यंत विवेकवादी दृष्टे संतपुरुष होते. त्यांनी आपल्या संपूर्ण आयुष्यात कोणताही चमत्कार केला नाही किंबहूना चमत्कार करणारा संतच असू शकत नाही ही ठाम भूमिका घेतली. पूर्णपणे मानवी मुल्यांची जपणूक करणारे अनुभव सिध्द व प्रयोगसिध्द मानवी दृष्टी बाळगणारे तुकाराम आपल्या अनेक अभंगातून अवैज्ञानिक चमत्कारांची हेटाळणी करताना दिसतात. तसेच 'नवस-सायास' या सारख्या समाजमनात रुतून बसलेल्या अंधश्रध्देवर प्रहार करतात. 'नवसे कन्यापुत्र होती | तरी का करणे लागे पती ||' ही त्यांची रचना जशी तत्कालीन लोकसमूहाला अंधश्रध्देच्या गर्तेतून बाहेर काढण्यासाठी महत्त्वाची ठरली तेवढीच ती समकालिन जीवनातही अंधश्रध्देच्या चिखल्या रुतलेल्या लोकांसाठी महत्त्वपूर्ण आहे.

काळ कोणताही असला तरी सत्याची कास धरुनच वाटचाल करावी लागते आणि हे सत्य बहुमतावर कधीच ठरत नाही. त्याला मानवी मनाची अंतःसाक्ष महत्त्वाची असते ही संत तुकारामांची ठाम भूमिका होती. म्हणूनच ते 'सत्य असत्या मन केले ग्वाही| मानियले नाही बहुमता||' हे सुत्र स्वतः अंगीकारुन आपल्या जीवनध्येयाशी भिडले. तुकारामांच्या या विचारसुत्रात सकळ मानव जातीचे हीत सामावले असून हा त्यांचा विचार आजही सामाजिक, राजकीय, सांस्कृतिक दहशतीखाली जीवन जगणाऱ्या प्रवाह पतीत समाजघटकांना जगण्याची नवी उमेद देत राहतो.

आपापल्या काळात शब्दांचे चुकीचे अर्थ लावून समाजातील शब्दज्ञानी शब्दांचा काथ्याकुट करण्यात माहिर असल्याचे दिसतात. असे लोक नेहमीच समाजाच्या प्रगतीच्या मार्गात मोठे अडसर ठरत असतात. अशा शब्दज्ञान्यांचा तुकाराम तिखट शब्दात समाचार घेतात. 'वांझेने दाविले गर्वार लक्षण| चिरगुटे बांधून वाथयाला||'अशा शब्दात केवळ शब्दपांडित्य मिरविणाऱ्या बोलघेवडयांची संभावना करुन तुकारामांनी मोठे समाजहिताचे काम केले आहे. अनुभवाला आपली प्रयोगशाळा मानणाऱ्या तुकारामांनी अनुभव शुन्य बोलणे व्यर्थ मानले आणि

समाजाकडे पाहण्याची एक नवी पारदर्शक समाजदृष्टी निर्माण केली. ती केवळ समकालिन जीवनातच नव्हे तर सार्वकालिक दृष्टया महत्त्वाची वाटते.

वर्तमानकालीन वास्तवात 'पर्यावरण संरक्षण' हा परवलीचा शब्द मानला जात आहे. उशीरा का होईना शहाणपण प्राप्त झालेल्या मानवाला पर्यावरणाच्या विनाशात आखिल मानव जातीच्या वंशाचा विनाश आहे ही प्रखर जाणीव झाली आहे. तुकारामांना मात्र फार पुर्वीच मानव आणि निसर्ग यांच्यातील जैविक संबंधाची सखोल जाण होती. 'वृक्षवल्ली आम्हा सोयरी वनचरे| पक्षीही सुस्वरे आळविती|| येणे सुखे रुचे एकांताचा वास नाही गुणदोष अंगा येत||' या सारख्या रचनेत तुकारामांनी केवळ निसर्ग व मानवाच्या जैविक संबंधावर भाष्य केले नाही तर मानसाच्या सुखाचा आणि आत्मिक समाधानाचा पासवर्ड निसर्गात दडलेला असल्याचे महत्त्वाचे रहस्य सांगितले आहे. निसर्गाला उपभोगाचे एक साधन मानून त्याचा स्वैर उपभोग घेऊन विनाशाच्या एका टकमक टोकावर येऊन उभा राहिलेल्या अखिल मानव समूहाला आता एका अटळ भय पर्वाला सामोरे जाण्याची वेळ आलेली आहे. अशा वेळी निसर्ग हे उपभोगाचे क्षुद्र साधन नाही तर ते व्यापक ईश्वरी तत्त्व आहे ही जाणीव देणारा तुकारामांचा विचार आजच्या काळात तारक ठरणारा आहे.

विवेकाधिष्टीत नसलेली श्रध्दा अंधश्रध्देत रुपांतरीत होते आणि हीच अंधश्रध्दा समाजहिताला अंतःर्बाहय बाधा निर्माण करते. असा अंधश्रध्दाळू समाज मग दैवाधिन होऊन प्रयत्त्नवादाचा त्याग करतो अशा समाजाला प्रयत्त्नवाद शिकविणाऱ्या संतांमध्ये तुकारामांचे कार्य अग्रगण्य आहे. 'ओले मूळ भेदी खडकाचे अंग| प्रयत्नाशी सांग कार्यसिध्दी ||' किंवा 'असाध्य ते साध्य | करिता सायास || कारण अभ्यास तुका म्हणे ||' या सारख्या अभंग रचनांव्दारे तुकारामांनी लोकजीवनातील उदाहरणांच्या व्दारे समाजपुरुषाला शिकविलेला प्रयत्नवाद अत्यंत महत्त्वाचा आहे. यशाचे रहस्य नशीबाच्या किंवा दैवाच्या अधिन नसून ते प्रयत्नांच्या पराकाष्ठेत सामावलेले आहे हा तुकारामांनी सांगितलेला विचार हा समकालिनच नव्हे तर सार्वकालीक दृष्टया महत्त्वाचा आहे. वर्तमान वास्तवामध्ये शिक्षणाचा प्रचार, प्रसार होऊनही दैववादाचे, शुभाशुभाचे भूत समाजपुरुषाच्या मानगुटीवरुन उतरलेले नाही ही वस्तुस्थिती आहे. किंबहुना अशिक्षित अडाणी माणासापेक्षाही अलिकडील काळामध्ये सुशिक्षित म्हणविल्या जाणाऱ्या व्यक्तींमध्ये दैवाधिनतेचे प्रमाण अधिक दिसते.अशा लोकांसाठी तुकारामांची ही अभंगमात्रा अधिक गुणकारी ठरु शकते.

आधुनिकीकरणाच्या प्रभावाखाली वर्ण, धर्म, जात,भेद नाहीसे होतील असे वाटत असताना धार्मिक व जातीय अस्मिता अधिकाधिक तीव्र होत असताना दिसत आहे. या पार्श्वभूमीवर संत तुकारामांनी तत्त्कालिन समाजस्थितीत घेतलेली समभावाची भूमिका महत्त्वाची आहे. 'अधिकार-जात, वर्ण-धर्म-जात| ठाव नाही सत्य-असत्याशी ||' ही भूमिका घेतलेले तुकाराम 'यारे यारे लहान थोर| याती भलते नारी नर||' अशी साद घालून सामाजिक एकोपा निर्माण करतात. शुद्र स्वार्थाला बळी पडून राष्ट्रीय आणि सामाजिक ऐक्याला गंभीर धोका निर्माण होण्याचा प्रसंग नित्याचाच असल्याचा दिसते. अशा वेळी तुकोबांच्या विचार सुत्रातील ऐक्य भाव आणि 'तुम्ही आम्ही एकमेळी | गदारोळी आनंदे ||' हा समाजभाव अत्यंत आवश्यक वाटतो.

आपल्याकडे वडीलोपार्जित असलेली कर्जखते गोरगरीबांचे संसार मोडू शकतात या विचाराने बैचेन होऊन तुकारामांनी आपल्याकडील कर्जखते इंद्रायणीच्या डोहात बुडवून टाकली व तत्त्कालिन शेतकऱ्यांना कर्जमुक्त केले. महाराष्ट्रामध्ये शेतकऱ्यांना कर्जमुक्ती देणारे संत तुकाराम हे पहिले युगपुरुष होते. वयाच्या एकविसाव्या वर्षी तुकारामांनी घेतलेल्या या निर्णयाचे सामाजिक मुल्य आजही तसुभर कमी झालेले नाही. दुष्काळ, नापिकी आणि कर्जबाजारीपणामुळे शेतकऱ्यांच्या एकापाठोपाठ होणाऱ्या आत्महत्या शासन आणि समाज अत्यंत असंवेदनशीलपणे पाहत आहे. या पार्श्वभूमीवर संत तुकारामांनी भीषण दुष्काळात शेतकरी कष्टकऱ्यांप्रती दाखविलेली संवेदनशीलता अत्यंत महत्त्वपूर्ण आहे.

संत नामदेवांनी सुरु केलेल्या किर्तन परंपरेचा लोकशिक्षणासाठी तुकारामांनी प्रभावी वापर केला. हे करीत असताना 'जेथे करावे किर्तन | तेथे न सेवावे अन्न||' अशी कठोर अचारसंहीता पाळून किर्तन माध्यमाचे पावित्र्य अबाधित ठेवले. याउपर किर्तनाचा बाजार मांडून आपले पोट भरण्याचा धंदा चालविणाऱ्या किर्तनकारांचा त्यांनी कठोर समाचार घेतला. 'काय गातो नाही ठावे | तोंड वासोनी म्हणतो दयावे|| झाले लोभाचे मांजर | भिक मागे दारोदार|| माप आणि गोणी | तुका म्हणे रिती दोन्ही||' अशा प्रकारे पोटभरु धंदा करणारे किर्तनकार आणि त्यांचे किर्तन-प्रवचन ऐकणारे या दोघांच्याही पदरी काहीच पडत नाही असा स्पष्ट निर्वाळा तुकाराम देतात. त्याचप्रमाणे 'उभ्या बाजारात कथा | हे तो नावडे पंढरीनाथा || अवघे पोटासाठी ढोंग | तेथे कैचा पांडुरंग || लावी अनुसंधान | काही देईल म्हणून|| काय केले रांडलेका | तुला राजी नाही तुका ||' या सारख्या तुकारामांच्या अभंगरचना वर्तमान वास्तवात किर्तनकारांनी मांडलेल्या बाजारावर भाष्य करण्यासाठी जशाच्या तशा लागू पडतात.

प्रत्येक समाजात त्या त्या समाजातील अज्ञानी लोकांच्या अज्ञानाचा फायदा घेऊन समाजशोषक बुवाबाबा तयार होतात. तुकारामांच्या काळातही असे अनेक भोंदू साधू आणि स्वतःला सदगुरु म्हणून मिरविणारे ढोंगी, मतलबी आणि भोगलोलुप लोक होते परंतु तुकारामांनी अशा मतलबी गुरुमहाराजांचा मुलाहिजा कधीच ठेवला नाही उलट 'ऐसे कैसे झाले भोंदू | कर्म करोनी म्हणती साधू ||' अशी कठोर शब्दात त्यांची फजितीच केली. अशा भोंदूंची दुकानदारी बंद केल्याने हे भोंदू तुकारामांच्या जीवावर उठले त्यांनी अनेकदा तुकारामांवर प्राणघातक हल्ले केले.

अशा प्रकारच्या लोकांकडूनच आपल्या जीवीताला धोका असल्याची तुकारामांनी पुरेपुर जाणीव होती. 'लावोनी कोलीत | माझा करतील घात ||' ही तुकारामांच्या अभंगातील साक्ष या दृष्टीने खूपच महत्त्वाची आहे. आपले हे जीवीत कार्य जरी समाजहिताचे असले तरी ते सुळावरील पोळी आहे याची तुकारामांनी पुरेशी जाणीव होती. "मठ संप्रदाय आणि गुरुबाजांच्या विरोधात तुकोबांनी फार मोठे बंड पुकारले होते. तुकाबांची ही कृती जाणीवपूर्वक होती. त्यांच्या या कृतीमागे प्राचीन व कालबाहय अशा परंपरेला शह देण्याची भावना होती." [१] आजच्या विज्ञान युगातही फसणाऱ्याला फसविण्यासाठी विज्ञान तंत्रज्ञानाच्या नवनव्या युक्त्या, प्रयुक्त्यांचा वापर करुन रोज नवनवे बुबा बापू तयार होत आहेत. समाजाची दिशाभूल करुन शोषण करीत आहेत. केवळ मतांच्या राजकारणांसाठी अशा बुवा बाबांबाबत भलेभले राजकारणी बोटचेपी भूमिका घेत आहेत. आणि असे बुवा बाबाच परिवर्तनवादी विचारवंतांच्या जीवावर उठत आहेत. या पार्श्वभूमीवर तत्कालिन कालखंडात तुकारामांनी दिलेली एकाकी झुंज अतिशय महत्त्वपूर्ण ठरते, मात्र ही लढाई आजही संपलेली नाही हे सुचन आपल्यासाठी महत्त्वाचे आहे. सद्यस्थितीत समाजामध्ये बोकाळलेला अंधश्रध्देचा बाजार आणि गुरुबाबांचा सुळसुळाट पाहता तुकारामांसारखी कर्तव्य कठोर भूमिका जाणीवपूर्वक घेणे गरजेचे आहे.

मध्ययुगातील "समाजमनावर प्रभाव गाजवित असलेल्या एका उद्दाम, अहंकारी आणि धर्माच्या नावावर अनीतीचा बाजार मांडणाऱ्या धर्मसत्येला कडवे आव्हान देणारा हा महान संत म्हणजे एक महान लढवय्या होता. अंतरंगाने किडक्या बहिरंगाने प्रबळ व मजबूत असलेल्या एका समाज व्यवस्थेच्या मुळाशी निर्भयपणे सुरुंग लावण्याचे काम त्यांनी आयुष्यभर केले."[२] अशा लढवय्या संताचा आदर्श समाजाला नेहमीच कालातीतपणे प्रेरक ठरत असल्या कारणाने संत तुकारामांचे जीवनकार्य, विचार वर्तमानस्थितीत समाजहितैषीच ठरते.

संत तुकारामांच्या सुमारे ५००० अभंगातील आवाहकता, वाङ्मयीन मुल्य आणि प्रबोधन सामर्थ्य विचारात घेता तुकारामांच्या व्यक्तिमत्त्वाचा जनमाणसावरील प्रभाव आजही कमी झालेला दिसत नाही. वर्तमान वास्तवातही संत तुकाराम नावाच्या युगपुरुषाने साहित्य, कला, संस्कृतीची सर्व अंगोपांगे व्यापलेली दिसतात. आधुनिक कालखंडात वेगवेगळया लेखक-विचारवंताने सुमारे अडीचशे ते तीनशे पुस्तके लिहून तुकारामांच्या कार्याचा मागोवा घेण्याचा प्रयत्न केला आहे. जागतिक किर्तीचा पहिला भारतीय चित्रपट प्रभातचा (संत तुकाराम) हाच होता. नाटक, कविता, कथा या साहित्यप्रकारामध्येही तुकाराम केंद्रीत विपुल लेखन झाले आहे. चित्र आणि शिल्प या कलांमध्ये भास्कर हांडे या चित्रकारांने तुकोबांच्या अभंगावर काढलेली अमूर्तशैलीतील चित्रे महत्त्वाची ठरली आहेत. आजही प्रेम माने सारखे नव्या दमाच्या चित्रकाराचे आशय विषयाचे केंद्रस्थान संत तुकाराम असल्याचे दिसते. स्थितीशील समाजाला गतिशील करण्यासाठी निरंतर प्रबोधनाची आवश्यकता असते. तुकारामांच्या अभंगवाणीमध्ये समाज प्रबोधनाचे हे मूल्य सार्वकालिक दृष्टीने महत्त्वाचे आहे. महाराष्ट्राच्या सांस्कृतिक पर्यावरणाचे केंद्रस्थान ठरलेल्या संत तुकारामांच्या प्रबोधनाचे मुल्य जसे तत्कालिन समाजस्थितीत महत्त्वाचे होते तितकेच ते समकालीन जीवनातही महत्त्वपूर्ण आहे.

## संदर्भ :-

१) सानप, किशोर : समग्र तुकाराम दर्शन, विजय प्रकाशन, नागपूर, प.आ. १ मे २००८ पृष्ठ ११८

२) साळुंखे,आ.ह.: विद्रोही तुकाराम, लोकायक प्रकाशन, सातारा, दु.आ. १९९९ पृष्ठ १०